महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा

**विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, छत्रपती संभाजीनगर**

एन-५, कॅनॉट परिसर, चिस्तीया पोलीस चौकीजवळ, छत्रपती संभाजीनगर- ४३१००१

दुरध्वनी :- (०२४०) २४८५३४५
वस्तीगृह :- (०२४०) २४८६३८३
E – Mail :- hfwtcabd@gmail.com


जा.क्र./आवकुकप्रकेंछसंन/भांडार/च.ना.जे.पु/ 3551 /२०२५
दि.०६.०६.२०२५.
Location Link:- https://maps.app.goo.gl/anJHRcAVKLRR9Jd28

## जाहीर सुचना

विषय:- आहार सेवा पुरवठा दरपत्रक सादर करणेबाबत...

उपरोक्त विषयानुसार आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, एन ५, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यालयाच्या भोजनगृहामध्ये आहार सेवा पुरविणेकरीता इच्छुक व पात्र स्थानिक पुरवठादारांकडून सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छुक पुरवठादारांनी सिलबंद लखोटयामध्ये संस्थेच्या लेटरहेडवर दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे.

**तांत्रिक कागदपत्रे :-**

मुख्य लखोटयामध्ये खालीलप्रमाणे तांत्रीक कागदपत्रे क्रमवार सादर करणेची आहेत :-

१) संस्था नोंदणी प्रमाणपत्र/शॉप ॲक्ट प्रमाणपत्र (चालू वर्षातील नूतनीकरणासह).
२) राज्य शासनाच्या सक्षम प्राधिकरणाने निर्गमीत केलेले अन्न व औषध प्रशासनाकडील **परवाना (Licence)** चालू वर्षाच्या नुतनीकरणासह
३) GST रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट
४) GST रजिस्ट्रेशन लागू नसलेस चॅर्टर्ड अकौन्टट् यांचे लेटरहेडवर सही व शिक्क्यानिशी GST रजिस्ट्रेशन लागू नसलेचे सर्टीफिकेट
५) आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅन कार्ड)
६) प्रपत्र-अ प्रमाणे दरपत्रकाराचे हमी पत्र

**व्यापारी लखोटा :-**

पुरवठादाराने खालीलप्रमाणे पुरवठादाराच्या लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे.

| अ. क्र. | तपशिल | अंदाजित दर (रुपये) | मुळ दर | GST | | दर रु. (सर्व करांसहीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | % | Amount | |
| १ | चहा (१ कप - १०० मि.ली.) | ९.०० | *पुरवठादाराने त्याच्या लेटरहेडवर संगणकीकृत दरपत्रक तयार करुन सही व शिक्यानिशी सादर करावे.* | | | |
| २ | कॉफी (१ कप - १०० मि.ली.) | १५.०० | | | | |
| ३ | एक प्लेट उपमा / शिरा / पोहे | २५.०० | | | | |
| ४ | इडली (२ नग) + चटणी-सांबर / मेदुवडा (२ नग) + चटणी-सांबर | ३०.०० | | | | |
| ५ | एक प्लेट मिसळ + २ पाव / अंडा ऑम्लेट + २ पाव | ४०.०० | | | | |
| ६ | उपवासाचे पदार्थ- एक प्लेट साबुदाणा खिचडी + २ केळी / दोन नग साबुदाणा वडा | ४५.०० | | | | |

| अ. क्र. | तपशिल | अंदाजित दर (रुपये) | मुळ दर | GST | | दर रु. (सर्व करांसहीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | % | Amount | |
| ७ | **शाकाहारी थाळी अमर्यादित**<br>चपाती, वरण, भात किंवा मसालेभात एक रस्सा भाजी, एक सुकी भाजी कोशिंबिर किंवा लोणचे, स्विट (श्रीखंड/ गुलाबजामुन/बासुंदी/खीर) सलाड, पापड | ९५.०० | *पुरवठादाराने त्याच्या लेटरहेडवर संगणकीकृत दरपत्रक तयार करुन सही व शिक्यानिशी सादर करावे.* | | | |
| ८ | **अंडा करी थाळी**<br>चपाती, पुलाव/भात, अंडाकरी (२ अंडी), सलाड, पापड | ८५.०० | | | | |
| ९ | **चिकन थाळी**<br>चपाती, बिर्याणी/जिरा राईस, एक प्लेट चिकन (फ्राय / मसाला), सलाड, पापड | १४५.०० | | | | |
| १० | **मटण थाळी**<br>चपाती, पुलाव/बिर्याणी/जिरा राईस, एक प्लेट मटण (फ्राय / मसाला), सलाड, पापड | २४०.०० | | | | |
| ११ | पॅकेज्ड् ड्रिंकींग बॉटल (५०० मि.ली) (बिसलेरी/किनले) | | | | | |
| १२ | पॅकेज्ड् ड्रिंकींग बॉटल ( १ लिटर) (बिसलेरी/किनले) | | | | | |
| १३ | पाणी जार ( २० लिटर) | | | | | |

<u>खालील अटी व शर्तीस अधिन राहुन दरपत्रक सादर करावे.</u>

१) मुख्य लखोटयामध्ये तांत्रिक कागदपत्रे, व्यापारी कागदपत्रे २ वेगवेगळया लखोटयात भरुन मुख्य लिफाफा सिलबंद करुन या कार्यालयात विहित मुदतीत जमा करावे. व्यापारी लखोटयावर "व्यापारी लखोटा" व कागदपत्रांच्या लखोटयावर "तांत्रिक लखोटा" असे लिहावे.

२) मुख्य लिफाफयावर संस्थेचे नाव, पत्ता, संपर्कासाठी मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी लिहिलेला असावा.

३) दरपत्रक " Principal, Health & Family Welfare Training Centre, N-5 Cidco, Chhatrapati Sambhajinagar " यांचे नांवे सादर करावे व लखोटयावर "Quotation for Canteen Service" असा उल्लेख असावा.

४) दरपत्रक नामंजूर झालेस त्याची कारणे या कार्यालयाकडून कळविली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

५) मुदतीनंतर (उशिरा) प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

६) दरपत्रकामध्ये खाडाखोड (Overwriting) केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

७) सर्व तांत्रिक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. अपुरी कागदपत्रे सादर केल्यास सदर पुरवठादारास दरपत्रक प्रक्रियेतून वगळण्यात येईल.

८) 'प्रपत्र-अ प्रमाणे दरपत्रकाराचे हमी पत्र' देऊन सुद्धा संगनमताने दरपत्रके सादर केल्यास संबंधित दरपत्रके प्रक्रियेतून वगळण्यात येईल.

९) ज्या दरपत्रकामध्ये निश्चित दर दिलेले नसतील अथवा दरामध्ये संदिग्धता असेल अशी दरपत्रके प्रक्रियेतून वगळण्यात येईल.

१०) नमूद करणेत आलेले दर सुस्पष्ट व वाचण्यायोग्य असावेत.

११) तांत्रिक लखोटयातील कागदपत्रे ही गठित केलेल्या समितीसमोर सादर केली जातील. तसेच आवश्यकता भासल्यास पुरवठाधारकांनाही दुरध्वनीद्वारे आमंत्रित केले जाईल. जर पुरवठाधारक उपस्थित राहू शकत नसतील तर त्यांनी आपला अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहणेकरीता त्यांना पत्र दयावे. जर पुरवठाधारक/प्रतिनिधी उपस्थित राहिले नाही तर त्यांना सदर प्रक्रियेबाबत तक्रार करता येणार नाही.

१२) समितीने घेतलेला निर्णय अथवा अटी व शर्ती शिथील केल्यास निविदाधारकांना बंधनकारक राहील. याबाबत निविदाधारकांना तक्रार करता येणार नाही.

१३) भोजनगृहाबाबत संस्थेच्या मालमत्तेस, प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीत व कार्यालयास त्रास न होण्याच्या हमीवर दरपत्रकाधारकाने भोजनगृह चालविणे आहे. याबाबत काही तक्रार अथवा अनुचित प्रकार कार्यालयाच्या निदर्शनास आलेस आहारसेवाचा करार रद्द करण्यात येईल.

१४) सदर बाबीकरता शासनाकडून मंजूरी व अनुदान उपलब्ध झाले नंतरच कंत्राटी आहार सेवा सुरु ठेवली जाईल.

१५) कोणत्याही परिस्थितीत संस्थेकडून अग्रिम दिला जाणार नाही.

१६) प्रशासकिय अथवा तांत्रिक कारणास्तव देयक अदा करण्यात विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

१७) भोजनगृहाचे दरमहा एकूण भाडे रु.३०००/- (अक्षरी रु.तीन हजार फक्त) धनादेशाद्वारे या कार्यालयास देणे बंधनकारक आहे.

१८) ज्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक मंजुर होईल त्या दरपत्रकधारकाने सुरक्षा ठेव रक्कम कार्यालयाकडे १५ दिवसाच्या आत जमा करणे बंधनकारक आहे. सुरक्षा ठेव रक्कमेचा धनाकर्ष "Administrative Officer, Health & Family Welfare Training Centre, Chhatrapati Sambhajinagar" यांचे नांवे काढण्यात यावा सदरची रक्कम रु.३०,०००/- (अक्षरी रु.तीस हजार फक्त) इतकी असेल तसेच निविदाधारकांने रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करार करुन देणे बंधनकारक आहे. कोणत्याही कारणास्तव पुरवठादाराने करार अर्धवट सोडला अथवा पुरवठादाराचे काम असमाधानकारक असल्यामुळे कार्यालयाकडून करार रद्द केला तर सदर सुरक्षा ठेव परत केली जाणार नाही.

१९) दरपत्रकेमधील दर हे फक्त Agency Nominate करणेकरीता निश्चित केले जातील. शासनाद्वारे वेळोवेळी मार्गदर्शक सुचनेनुसार दिलेले दर याला अधीन राहून देयके अदा करणेत येतील.

२०) दरपत्रकाधारकास पुरवठा कालावधीमध्ये कोणतेही कर लागू झाले/वाढून आलेस मंजूर दरपत्रकातील दर वाढून मिळणार नाहीत. सदर सर्व कर भरण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहिल.

२१) मांसाहारी मेनू थाळीमध्ये चिकन, मटण व अंडाकरी प्लेट वगळता इतर जिन्नस तसेच शाकाहारी मेनूमधील सर्व जिन्नस अमर्यादीत पुरवावे लागतील.

२२)प्रशिक्षणार्थींना चहा/नाष्टा व जेवणाचा दर्जा उत्तम प्रकारचा रहाणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थीकडून आपणांबाबत काही तक्रार झालेस दरपत्रकधारकास लेखी समज दिली जाईल. त्यानंतरही वारंवार तक्रारी असतील तर दरपत्रकधारकाचा करार रद्द करण्यात येईल तसेच सुरक्षा ठेव जप्त करुन पुरवठादाराचे नाव काळया यादीत टाकले जाईल.

२३)प्रशिक्षणार्थींची क्षेत्र भेट व वर्कशॉप ज्या ठिकाणी असेल तेव्हा त्या क्षेत्राच्या/वर्कशॉपच्या ठिकाणी चहा, नाष्टा व जेवण सुविधा स्वखर्चाने पुरविणे बंधनकारक राहील.

२४)प्रशिक्षणार्थींना भोजन वाढण्यासाठी पुरवठादाराने नेमलेला कर्मचारी वर्ग स्वच्छ, निरोगी, टापटीप तसेच निर्व्यसनी असावा.

२५)पुरवठादराने नेमलेले कर्मचारी कोणत्याही गुन्हयांशी अथवा कायदेभंग विषयक प्रकरणाशी संबंधीत नसतील याची दक्षता घेण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहिल.

२६)अन्न व भेसळ प्रतिबंधक कायद्याचे पालन करण्याची तसेच त्या अंतर्गत कोणत्याही कार्यवाहीची जबाबदारी पुरवठादाराची राहिल.

२७)अन्न विषबाधा होऊन शारिरीक/जिवितहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहील.

२८)भोजनगृह दररोज स्वच्छ व निटनेटके ठेवण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहिल. तसेच पुरवठादारास स्वखर्चाने स्वयंपाकगृहाचे पेस्ट कंट्रोल करावे लागेल.

२९)पाण्याचा वापर निव्वळ भांडी धुणे, भाजीपाला धुणे, स्वयंपाक करणे, स्वयंपाकगृह व उपहारगृहाची स्वच्छता यासाठीच करता येईल. इतर बाबीसाठी पाण्याचा वापर करता येणार नाही.

३०)विजेचा वापर लाईट, पंखे, टि व्ही, वॉटर फिल्टर, वॉटर कुलर, व्हॅक्यूम क्लीनर, किचन मधील मिक्सर इ.साठी करता येईल. याशिवाय विजेवर चालणारी इतर उपकरणे वापरता येणार नाहीत.

३१)या संस्थेच्या प्रतिमेला धक्का पोहचेल किंवा संस्थेची प्रतिमा मलिन होईल अशी कोणतीही कृती पुरवठादाराने करु नये.

३२)पुरवठादाराने भोजन पुरवठा दर्जेदार करणे बंधनकारक आहे. अन्नपदार्थ तयार करण्यासाठी उत्तम दर्जाचे किराणा माल, वस्तु, मसाले, भाजीपाला व कच्चा माल वापरला पाहिजे. संस्थेचे प्राचार्य यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास केव्हाही स्वयंपाकगृह तसेच पुरविण्यात येणारे साहित्य कोणत्या प्रकारचे आहेत हे तपासण्याचे अधिकार राहतील. गरज भासल्यास साहित्याची (किराणा माल, वस्तु, तेल, मसाले इ.) शासकिय/खाजगी प्रयोगशाळेतून तपासणी करुन घेतली जाईल. प्रयोगशाळेचे तपासणी शुल्क पुरवठादारास अदा करावे लागेल. तपासणीमध्ये साहित्याचा दर्जा योग्य नसल्याचे आढळून आल्यास पुरवठादाराचा करार रद्द करण्यात येईल.

३३)प्रशिक्षणार्थी यांचे प्रत्यक्ष उपस्थित संख्येनुसार चहा, नाष्टा व जेवणाची रक्कम दरपत्रकामधील मंजूर दराप्रमाणे PFMS/NEFT/CMP द्वारे अदा करणेत येईल. तसेच प्रत्येक बिलातून नियमाप्रमाणे टी.डी.एस.ची. व जी.एस.टी. रक्कम कपात करणेत येईल.

३४)कामावर असताना कोणतेही दुर्घटना झाल्यास व कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यास दुखापत/मुत्यू झाल्यास सदरची नुकसान भरपाई/मोबदला देण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. तसेच सदर प्रकरणी न्यायप्रविष्ट बाबी, अथवा वाद निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. या अनुषंगाने नियमानुसार योग्य ते इन्शुरन्स करण्याची

जबाबदारी पुरवठादाराची राहील. याबाबत हे कार्यालय/आरोग्य विभाग कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

३५) मंजुर दरपत्रकाची मुदत ही दरपत्रक मंजुर झालेल्या दिनांकापासून एक वर्षापर्यंत किंवा रु.दहा लाखांच्या मर्यादेत राहील. सदर कालावधी संपल्यानंतर नवीन दरपत्रक अस्तित्वात येण्यास काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास त्या कालावधीत सध्याच्याच अटी व शर्तीनुसार दोघांच्या संमतीने तीन महिन्याच्या कालावधीसाठी किंवा पुढील नवीन दरपत्रक अस्तित्वात येईपर्यंत चालू राहील.

३६) मंजुर पुरवठादाराने शर्ती व अटींचा भंग केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. दरपत्रके मंजुर झालेल्या पुरवठादाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निर्देशनास येताच पूर्व सुचनेशिवाय कंत्राट रद्द करण्यात येईल आणि मंजुर पुरवठादाराचे नाव काळया यादीत टाकून सुरक्षा ठेव रक्कम (सिक्युरिटी डिपॉझीट) जप्त करण्याबाबतची कडक कारवाई करण्यात येईल.

३७) आहार सेवा पुरविणेकरीता भोजनगृहामध्ये या कार्यालयामार्फत ६४ लोकांची बैठक व्यवस्था उपलब्ध आहे. सदर वस्तू काळजीपूर्वक हाताळणे आवश्यक आहे. काही नुकसान झाल्यास कंत्राटदाराकडून नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल. इतर आवश्यक त्या सर्व वस्तू व खादय साधनसामुग्री पुरवठादारामार्फत पुरविल्या जाणे बंधनकारक राहील.

३८) आहार सेवेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील

अ) चहा व नाष्टा :- सकाळी ८.०० ते १०.०० वा.

ब) चहा :- सकाळी ११.३० वा.

क) दुपारचे जेवण :- दुपारी ०१.०० ते २.३० वा.

ड) दुपारचा चहा :- दुपारी ४.०० ते ५.०० वा.

ई) रात्रीचे जेवण :- रात्री ७.३० ते ९.३० वा.

३९) भोजनगृहामध्ये आहार सेवेशी निगडीत साहित्यच ठेवणेस परवानगी आहे. इतर वैयक्तीक/प्रापंचिक/वाहने भोजनगृह परीसरात ठेवण्यात येऊ नये.

४०) भोजनगृहामध्ये रात्रीच्या वेळेस जास्तीत जास्त दोन पुरुष व्यक्तींना राहण्यास परवानगी आहे. महिलांना रात्रीच्या वेळेस भोजनगृहामध्ये राहण्यास परवानगी नाही.

४१) आहार पुरवठादाराने प्रशिक्षण केंद्रातील कोणत्याही शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्यास त्याची भरपाई संबंधित पुरवठादारास देय होणाऱ्या रक्कमेतून वसूल केली जाईल.

४२) पुरवठादाराने सदर कामासाठी उपपुरवठादार नेमू नयेत. उपपुरवठादार नेमलेचे निदर्शनास आलेस करार रद्द करणेत येईल.

४३) दरपत्रक कोणतेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे, रद्द करणे तसेच दरपत्रक प्रक्रिया रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद, छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवलेले आहेत.

४४) दरपत्रक मंजुर झाल्यानंतर १५ दिवसांमध्ये करारनामा रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर (स्वखर्चाने) वेगळा करावा लागेल.

४५) दरपत्रके समितीसमोर **दि.१९/०६/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता** आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, एन-५ सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे उघडली जातील.

४६)सदर आहार सेवा पुरवठा आदेश मिळालेपासून **एक वर्ष किंवा दहा लाखांच्या मर्यादेत** ग्राहय राहिल.

४७)सदर दरपत्रक प्रक्रियेबाबतच्या न्यायप्रविष्ठ बाबी छत्रपती संभाजीनगर शहर न्याय परिक्षेत्रात मर्यादीत राहतील.

वरील अटी व शर्ती **प्रमाणे** सिलबंद **दरपत्रके** प्राचार्य, आरोग्य व कंटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, एन–५ सिडको, छत्रपती **संभाजीनगर यांचे नावाने दिनांक १७/०६/२०२५** रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावीत. **दिनांक १७/०६/२०२५ कार्यालयीन वेळेनंतर** प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**(डॉ संतोष कडले)**
**प्राचार्य**
**आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण**
**केंद्र, छत्रपती संभाजीनगर**

# दरपत्रक धारकांनी तांत्रिक कागदपत्रांमध्ये द्यावयाच्या हमीपत्राचा नमुना

## प्रपत्र–अ

मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध/संघर्ष नाही. तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच दरपत्रक सादर केलेले आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थांमध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही. सदर जाहीर सुचनेमधील सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य आहेत.

दरपत्रकाराची सही व संस्थेचा शिक्का

## आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना द्यावयाच्या भोजनाचा तपशील

| अ. क्र. | तपशील | दर रु.(सर्व करांसहीत) |
|---|---|---|
| 1 | चहा ( १ कप - १०० मि.ली.) | |
| 2 | कॉफी ( १ कप - १०० मि.ली.) | |
| 3 | एक प्लेट उपमा / शिरा / पोहे | |
| 4 | इडली ( २ नग) + चटणी-सांबर / मेदुवडा ( २ नग) + चटणी-सांबर | |
| 5 | एक प्लेट मिसळ + २ पाव / अंडा ऑम्लेट + २ पाव | |
| 6 | उपवासाचे पदार्थ- एक प्लेट साबुदाणा खिचडी + २ केळी / दोन नग साबुदाणा वडा | |
| 7 | **शाकाहारी थाळी अमर्यादित** चपाती, वरण, भात किंवा मसालेभात एक रस्सा भाजी, एक सुकी भाजी कोशिंबिर किंवा लोणचे, स्विट (श्रीखंड/ गुलाबजामुन/बासुंदी/खीर) सलाड, पापड | |
| 8 | **अंडा करी थाळी** चपाती, पुलाव/भात, अंडाकरी ( २ अंडी), सलाड, पापड | |
| 9 | **चिकन थाळी** चपाती, बिर्याणी/जिरा राईस, एक प्लेट चिकन मसाला, सलाड, पापड | |
| 10 | **मटण थाळी** चपाती, पुलाव/बिर्याणी/जिरा राईस, एक प्लेट मटण (फ्राय / मसाला), सलाड, पापड | |
| 11 | पॅकेज्ड् ड्रिंकींग बॉटल (५०० मि.ली) (बिसलेरी/किनले) | |
| 12 | पॅकेज्ड् ड्रिंकींग बॉटल ( १ लिटर) (बिसलेरी/किनले) | |
| 13 | पाणी जार ( २० लिटर) | |

पुरवठादाराची सही व शिक्का